MHBI160022132022

**नि.दि.दावा क्र.१४३१/२०२२**
**संगिता वि. कल्पना**

## आदेश नि.१६ वर

प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ व आदेश १ नियम १० अन्वये दावा दुरुस्तीसाठी व दाव्यामध्ये प्रतिवादी समाविष्ट करणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास हरकत घेतली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी दावा प्रलंबित असताना वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकती प्रतिवादी क्र.७ ते ९ यांना विक्री केल्या आहेत. त्यामुळे ते वादीचे शांततामय ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. म्हणून प्रतिवादी क्र.७ ते ९ यांना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. तसेच त्या अनुषंगाने वादीस दाव्यामध्ये दुरुस्त्या करणेही गरजेचे आहे. त्यामुळे वादीने अर्जात नमुद प्रमाणे दुरूस्ती करावयाची मागणी केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर फक्त हरकत आहे असे नोंदवले आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुददे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## कारणमिमांसा

**मुद्या क्र. १ करिता**

५. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व स्वतंत्र ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ ने दावा प्रलंबित असताना वादग्रस्त मिळकती या त्रयस्त व्यक्तीस विक्री केलेल्या आहेत. वादीने नि.१५ सोबत खरेदीखत क्र.१०९८/२०२२ ची प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन करता वादग्रस्त मिळकती या त्रयस्त व्यक्तीस विक्री केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती पाहता ती दाव्याच्या अनुषंगीक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज जरी मंजूर केला तरी प्रतिवादींना आपले म्हणणे दाखल करण्याची मुभा असणार आहे. वादीने अर्जात मागितलेली दुरुस्ती पाहता दाव्याच्या स्वरुपात बदल होणार असल्याचे दिसून येत नाही. वादीने दावा प्रलंबित असताना जमीन विक्री केल्यामुळे ते खरेदी लिहून घेणार हे दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुत वादीची दुरुस्ती मान्य केल्यास नक्कीच त्याचा फायदा हा दाव्याच्या न्यायनिवाडयाकरीता होणार असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास त्याचा फायदा दाव्याच्या उलगडयाकरिता आवश्यक होणार आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे तो मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सुचित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्याच्या आत करावी.

३. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2023.03.27 17:49:34 +0530

(अ.त्रिं.मनगिरे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शिरुरकासार.

दिनांक २७/०३/२०२३

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 27/03/2023 |
| Transcribed on | : | 27/03/2023 |
| Checked & signed on | : | 27/03/2023 |